महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

अतितात्काळ/कालमर्यादा-

क्र. पोमसं/३१/२५२६/ग्रामपंचायत कर/मौजे महिंदळे/२१/२०१५ मुंबई, दिनांक : ३० /०४/२०२६

**विषय :- पोलीस महासंचालकांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस घटक कार्यालयांच्या अखत्यारित येणाऱ्या पोलीस इमारतींच्या थकीत मालमत्ता कराबाबतची माहिती सादर करणेबाबत..**

*****

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यातील पोलीस विभागाच्या अखत्यारित असलेल्या विविध पोलीस इमारतींच्या थकीत मालमत्ता कराची रक्कम महानगरपालिका / नगरपारिषद / नगरपालिका व ग्रामपंचायत यांना अदा करणेबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. त्यास अनुसरुन थकीत मालमत्ता कराची अदयावत माहिती शासनास सादर करावयाची आहे. तरी, आपल्या अधिपत्याखालील सर्व पोलीस घटक कार्यालयांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस इमारतींच्या थकित मालमत्ता कराची सविस्तर माहिती खालील विहीत नमुन्यात (Excell Sheet) मध्ये तयार करुन **दि.०४/०५/२०२६ रोजी १७.०० वाजेपर्यंत** न चुकता project2.dgoffice@mahapolice.gov.in या ई-मेल आयडी वर सादर करावी.

| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | कार्यालय / इमारत / पोलीस स्टेशन /निवासस्थानाचे नाव | थकित मालमत्ता कराची रक्कम | ग्रामपंचायतीचे नाव | नगरपालिकेचे नाव | नगरपरिषदेचे नाव | महानगरपालिकेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | | | |
| २. | | | | | | | |
| ३. | | | | | | | |

**सूचना :-**

१. सर्व घटक प्रमुखांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व कार्यालये, इमारती, पोलीस स्टेशन आणि निवासस्थानांची नावे स्पष्ट नमूद करुन थकित मालमत्ता कराची अचूक रक्कम नोंदवावी.

२. पोलीस इमारती ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (महानगरपालिका / नगरपारिषद / नगरपालिका व ग्रामपंचायत) कार्यक्षेत्रात येतात, त्यानुसार स्वतंत्रपणे व स्पष्टपणे माहिती नमूद करावी.

३. थकित मालमत्ता कराची रक्कम निरंक असल्यास तसा अहवाल खालील कारणांसह स्पष्टपणे सादर करावा.

अ. सदर मालमत्ता करातून अधिकृत सूट मिळाली, किंवा

ब. मालमत्ता कराचा पूर्ण भरणा वेळेत केलेला आहे.

उदा. खालीलप्रमाणे माहिती सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | घटक कार्यालयाचे नाव | कार्यालय / इमारत / पोलीस स्टेशन / निवासस्थानाचे नाव | थकित मालमत्ता कराची रक्कम | ग्रामपंचायतीचे नाव | नगरपालिकेचे नाव | नगरपरिषदेचे नाव | महानगरपालिकेचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | समादेशक, रारापोबल, गट क्र.६, धुळे | कार्यालयाची इमारत | रु.-------/- | महिंदळे ग्राम पंचायत | - | - | - |
| २. | पोलीस अधीक्षक, नांदेड | निवासी इमारत | रु.-------/- | - | नगरपालिका नांदेड | - | - |
| ३. | प्राचार्य, पो प्र केंद्र, जालना | कार्यालयाची इमारत | रु.-------/- | - | - | जालना नगरपरिषद | - |
| ४. | पोलीस आयुक्त, अमरावती | पोलीस स्टेशनचे नाव | रु.-------/- | - | - | - | अमरावती महानगरपालिका . |

(अभिषेक त्रिमुखे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, म.राज्य, मुंबई.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य, पुणे,
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / वाहतूक / आर्थिक व गुन्हे शाखा / फोर्स वन / नागरी हक्क संरक्षण / राज्य राखीव पोलीस बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्ग सह), **(बृहन्मुंबई वगळून)**
अपर पोलिस महासंचालक व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक,
अपर पोलिस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.राज्य, पुणे,
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे / नक्षल विरोधी अभियान, नागपूर,
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक,
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर,
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सह),
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, नागपूर,
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक,

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र (रा.रा.पो.बल. नानवीज सह) / अपारंपारिक अभियान प्रशिक्षण (UOTC), केंद्र, नागपूर,

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१ ते १९

कार्यालय अधीक्षक, का.क्र.-१९ अ, ३६ (पोमसं कार्यालय)

<u>प्रत:-</u>

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधीक्षक,, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू परिपत्रकाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर फ्लॅश या सदराखाली प्रसारित करण्यात यावी.